# ग्राहक गाऱ्हणे निवारण मंच

(विद्युत कायदा ,२००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**जळगाव परिमंडळ**


**दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४**
**Email :-cgrfjalgaonzone@gmail.com**
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच**
**जुनी एम.आय.डी.सी.**
**महावितरण विश्राम गृहाजवळ,**
**अजिंठा चौफुली जळगाव. ४२५००३**


जा.क्रः स.स./ग्रागानिमं/जप/जळगाव मं/०७–२०१८–१९/ **00042** दिनांकः **18 SEP 2018**

**(रजिष्टर पोच व्दारे)**

**गाऱ्हाणे दाखल दिनांक : २२/०६/२०१८**
**निकाल दिनांक : १५/०९/२०१८**

प्रति,

१. श्री चंपालाल बाबुलाल सोनी.(गोल्ड जिम)
सर्वे नं-४९०,प्लॉट नं -५८, एम.जे.कॉलेज जवळ,
जळगाव ता.जि. जळगाव. पिन-४२५००१
(ग्रा.क्र.११००१४५५१३६१) } तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
मंड्ळ कार्यालय जळगाव

३. कार्यकारी अभियंता
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
विभागिय कार्यालय, जळगाव. } विज वितरण कंपनी

(सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., जळगांव, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच)

## निर्णयपत्र

श्री चंपालाल बाबुलाल सोनी.(गोल्ड जिम) सर्वे नं-४९०,प्लॉट नं -५८, एम.जे.कॉलेज जवळ, जळगाव ता.जि. जळगाव. हे विज वितरण कंपनीचे औद्योगिक (LT-II) प्रवर्गातील ग्राहक आहेत. महावितरण कंपनीकडुन वीज आकारणी करणे संदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र सदोष असल्याचे ज्या महिन्यापासुन निदर्शनास आले असेल त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महीन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजीत करुन संदर्भीय वीजदेयक रद्दबातल ठरवुन नवीन वीजदेयके देणेबाबत , योग्य ते आदेश पारीत करावेत व इतर अनुषंगिक न्यायोचित आदेश होण्याबाबत योग्य ती कार्यवाही होवुन न्याय मिळण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. मात्र अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडुन दिलेला निकाल मान्य नसल्यामुळे ग्राहकाने आपले गाऱ्हाणे अनुसुची "अ" मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे दि २२.०६.२०१८ रोजी नोंदविण्यात आले.

त्यानुसार मंचाचे अध्यक्ष ,सदस्य-सचिव व सदस्य यांनी आपसात सल्लामसलत करुन हे प्रकरण सुणावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर गाऱ्हाण्याची सुणावनी दि.२७.०७.२०१८ रोजी घेण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि. १८.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय जळगाव व कार्यकारी अभियंता विभागिय कार्यालय जळगाव यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या जळगाव मंड्ळ कार्यालयाकडुन प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर.एफ.पवार, तसेच जळगाव विभाग कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता श्री संजय तडवी, हे उपस्थित होते. तर ग्राहक प्रतिनिधी श्री श्यामसुंदर अग्रवाल हे व ग्राहक श्री चंपालाल बाबुलाल सोनी हे स्वत: उपस्थित होते.




Scanned by CamScanner

**ग्राहकाची बाजु :-**

आमचा वरील ठिकाणी वरील नावाने उद्योग व्यवसाय आहे, सदरील व्यवसायासाठीन लागणारा वीज पुरवठा आम्ही महावितरण कंपनीकडुन मागितला असता त्यांनी तो पुरविला असुन व त्यासाठी त्यांनी आम्हाला त्यांच्या कंपनीचा ११००१४५५१३६१ ग्राहकाचा क्रमांक सुध्दा आंबटीत केला होता व आहे.

महावितरणच्या जळगाव येथील उप-विभागिय कार्यालयाने आम्हास दिलेल्या वरील जोडणीस माहे नोव्हेंबर २०१७ साठी तसेच माहे जानेवारी -२०१८ साठी निर्गमीत केलेल्या वीज देयकात अनुक्रमे रक्कम रु.७,९६,४२१.५९ व रक्कम रु.३,६८,७९२.२७ अशी एकुण रक्कम ११,६५,२१३.८६ Debit Bill Adjustment या सदराखालील नमुद करुन तशी वीज आकारा व्यतिरीक्त अतिरीक्त रक्कमेची मागणी आमच्याकडुन केलेली आहे. आपल्या माहितीसाठी आम्ही सदरील देयके या तक्रारीसोबत जोडीत आहोत.

याबाबत आम्ही महावितरणच्या जळगाव येथील उप-विभागिय कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवुन माहिती घेतली असता, सदरील कार्यालयाने आमच्या संदर्भीय वीज जोडणीस लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter) सदोष (Faulty) असल्याकारणास्तव महावितरणच्या चाचणी विभागाने (Testing Division) दिलेल्या अहवालानुसार आम्हास, माहे जुन-२०१५ ते सप्टेंबर -२०१७ पावेतो आम्हास प्रत्यक्षात आकारलेल्या युनिट्स मध्ये २९.६९ ट्क्क्यांनी वाढ करुन होणाऱ्या बिलाची व प्रत्यक्षात भरणा केलेल्या बिलाची वजावट करुन येणारी एकुण रक्कम रु. ११,६५,२१३.८६ आमच्या संदर्भिय बिलाअन्वये आकारणी केल्याचे सांगितले.

आमच्यावर नमुद वीज जोडणीस पुर्वी महावितरण कंपनीकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter) सदोष (Faulty) असल्याबाबत आमची सक्त हरकत असुन, तुर्त आमचे त्या बाबत काही म्हणणे नाही.

मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांनी जाहीर केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्यांच्या इतर अटी) विनीयम ,२००५ यात मीटर सदोष असतांना देयके तयार करणेबाबत नमुद केलेल्या विनिमय क्र.१५.४ अन्वये मीटर सदोष असल्याचे ज्यामहिन्यात निदर्शनास आले असेल त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील ग्राहकाच्या वीज देयकांची रक्कम समायोजित करणेबाबत स्पष्ट तरतुद असतानांही महावितरणाच्या जळगाव येथील उपविभागिय कार्यालयाने , आमच्यावर नमुद वीजजोडणीस पुर्वी आपल्या कंपनीकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter ) ज्या महिन्यापासुन सदोष (Faulty) आढळुन आले त्या महिन्यापासुन मागील २८ महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित केलेली असल्याकारणास्तव ; आम्ही दि.०९.०४.२०१८ रोजी , महावितरणाच्या जळगाव येथील विभागिय कार्यालयास, वर नमुद विनियमाअन्वये आमच्यावर नमुद वीज जोडणीस पुर्वी महावितरणाकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter ) ज्या महिन्यापासुन सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल. त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित करुन, संदर्भिय वीज देयके रद्दबातल ठरवुन, नवीन वीज देयके देण्याची रीत सर लेखी तथा तोंडी विनंती केली होती. आपल्या माहितीसाठी आम्ही सदरील अर्जाची प्रत या तक्रारी सोबत जोडीत आहे.

परंतु,महावितरणच्या जळगाव येथील विभागिय कार्यालयाने,आमच्या व नमुद सदरील अर्जावर कोणताही निर्णय घेतला नाही.

म्हणुन नाईलाजाने , आम्ही सदरील गाऱ्हाणे निवारणार्थ , दि.२४.०४.२०१८ रोजी, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच आणि विद्युत लोकपाल ) विनियम, २००६ च्या विनियम ६.२ अन्वये, अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्षा समोर, मेहरबान म.वि.नि. आयोगाने जाहीर केलेल्या विनियमाअन्वये आमच्या वर नमुद वीज जोडणीस , वीज आकारणी करणे संदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter) सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल, त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित करुन, संदर्भीय वीज देयके रद्द करुन , नवीन वीज देयक देणेबाबत; योग्य ते आदेश पारित करणेबाबत अर्ज दाखल केला.

त्याअन्वये अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्षाने याबाबत सुनावणी ठेवुन आमचे (तक्रारदाराचे) काही एक म्हणणे ऐकुन घेता पक्षपाती / पूर्वग्रहदुषित मनाने एकतर्फ़ी आदेश पारित केला तो खालील प्रमाणे :

१. महावितरण कडुन ग्राहकास देण्यात आलेले बिल योग्य आहे.
२. सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

म्हणुन शेवटी निराश होवुन, आम्ही सदरील गाऱ्हाणे, निवारणार्थ आपल्या मंचासमोर दाखल करीत आहोत.

**कारणे:-**

१. मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांनी जाहीर केलेल्या, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्यांच्या इतर अटी) विनीयम ,२००५ यात मीटर सदोष असतांना देयके तयार करणेबाबत नमुद केलेल्या



Scanned by CamScanner

विनिमय क्र. १५.४ अन्वये मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल, त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील ग्राहकाच्या वीज देयकांची रक्कम समायोजित करणेबाबत स्पष्ट तरतुद असतानांही, महावितरणाच्या जळगाव येथील उपविभागिय कार्यालयाने, आमच्या वर नमुद वीज जोडणीस पुर्वी महावितरण कंपनीकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter ) ज्या महिन्यापासुन सदोष (Faulty) आढळुन आले त्या महिन्यापासुन मागील २८ महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित केलेली असल्याकारणास्तव.

२. महावितरणचे सदरील कार्य पूर्णत: बेकायदेशिर व चुकीचे असुन मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी जाहीर केलेल्या संदर्भीय विनियमाच्या तरतुदीचे स्पष्ट पणे भंग उल्लंघन करणारे /असल्याकारणास्तव.

३. वर नमुद केल्या अन्वये तसेच सोबत जोडलेल्या दस्ताऐवजा अन्वये महावितरणने मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी जाहीर केलेल्या संदर्भीय विनियमाच्या तरतुदीचे स्पष्ट पणे उल्लंघन/ भंग केला असल्याकारणास्तव महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच आणि विद्युत लोकपाल ) विनियम, २००६ च्या तरतुदी अन्वये, सदरील गाऱ्हाणे दाखल करुन घेऊन त्यावर योग्य तो आदेश पारित करणे न्यायसंगत असल्याकारणास्तव.

**निर्णय /निवाडे/आदेश :-**

1. Representation No. 11 OF 2012 (Shri Abdul Hamid Salam V/s. MSEDCL)
2. Representation No. 100 OF 2010 (M/s. Rajlaxmi Home Products V/s. MSEDCL
3. Case No. 21/2016-17 (Vega Chemicals Pvt. Ltd. V/s. MSEDCL)

**ग्राहकाच्या मागण्या :-**

अ. मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने जाहीर केलेल्या विनियमाअन्वये, आमच्या वर नमुद वीज जोडणीस पुर्वी महावितरण कंपनीकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter) ज्या महिन्यापासुन सदोष (Faulty) आढळुन आले त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित करुन, संदर्भीय वीज देयके रद्दबातल ठरवुन , नवीन वीज देयके देणेबाबत, योग्य ते आदेश पारित करावे.

आ. न्यायाच्या दृष्टीने , अर्जदाराच्या हिताचे व अर्जदाराच्या बाजुने योग्य ते अन्य आदेश पारित करावे.

**तसेच ग्राहक प्रतिनिधी यांनी विभागिय कार्यालय ,जळगाव यांनी दि.०८.०८.२०१८ रोजी सादर केलेल्या अतिरीक्त खुलाश्यास उत्तर :**

महावितरणने दि.२७.०७.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यानी सदरील गाऱ्हाण्यात अतिरीक्त खुलासा सादर केला करणेबाबत मंचाकडे मुदत मागितली असता , मे. मंचाने महावितरणास त्यांच्या अतिरीक्त खुलासा सादर करणेबाबत दि.०४.०८.२०१८ पावेतो मुदत दिली होती.

परंतु प्रत्यक्षात महावितरणाने आपला अतिरीक्त खुलासा मे.मंचाकडे दि.०७.०८.२०१८ रोजी सादर केला असुन तसेच आम्हास दि.०८.०८.२०१८ रोजी सदरील खुलास्याची प्रत पाठविली होती.

सर्वात प्रथम महावितरणने सादर केलेला वर नमुद अतिरीक्त खुलासा मुदतीत सादर केला नसल्या कारणास्तव तो सदरील गाऱ्हाण्यात ग्राह्य धरण्यात येऊ नये. हि मंचास नम्र विनंती.

महावितरणने सादर केलेला अतिरीक्त खुलासा मंचाने ग्राह्य धरल्यास, आम्ही आमचे अधिकार सुरक्षित ठेवुन, दि.२७.०७.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मे. मंचाने निर्देशिल्यानुसार आम्ही महावितरणने सादर केलेल्या अतिरीक्त खुलास्यावर आमचा खुलासा सादर करतो तो येणेप्रमाणे :-

१. महवितरणच्या अतिरीक्त खुलास्याच्या परिच्छेद क्र. १,२ व ३ बाबत आमचे काही एक म्हणणे नाही.
२. महवितरणच्या अतिरीक्त खुलास्याच्या परिच्छेद क्र. ४,६ व ७ मधील मजकुर अंशत: बरोबर असुन अंशत: खोटे आहे. कारण आम्ही कधीही महावितरणने दिलेले फ़रकाचे बिल मान्य असल्याचे व ते भरण्याची सहमती दिलेली नव्हती जे काही लिहुन घेतले गेले ते जबरदस्तीने व तसेच बळजबरीने व आमचा विद्युत पुरवठा खंडीत करुन आम्हास आर्थिक अडचणीत आणण्याबाबतचा दवाव निर्माण करुन लिहुन घेतलेले होते, त्याबाबत आम्ही सविस्तर पत्र आम्ही , महावितरणास मागेच दि.२७.०६.२०१८ रोजी सादर केले असुन , आपल्या अधिक माहितीसाठी सदरील अर्जाची प्रत आम्ही या खुलास्यासोबत जोडत आहोत. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी काहीही लिहुन घेतले असेल किंवा आम्ही काहीही दिले असले, असे ग्रृहीत धरले तरी, घटनेनुसार आम्हास प्राप्त झालेले आमचे कोणतेही अधिकार कोणीही , कशाही प्रकारे हिरावू शकत नाही.



Scanned by CamScanner

३. महवितरणच्या अतिरीक्त खुलास्याच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये नमुद केलेली बाब अंशत: चुकीची व दिशाभुल करणारी आहे, सदरील परिच्छेदात महावितरणने नमुद केल्यानुसार अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने या गाऱ्हाण्या संबंधात आदेश पारित केला असल्याचे म्हणणे अंशत: खरे असले तरी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने सदरील या गाऱ्हाण्यावर गुणवत्तेवर आधारीत (Merit वर) निर्णय दिलेला नसुन, तसेच सदरील अंतर्गत ग्राहक तक्रार कक्षाचे अध्यक्ष हे पुर्वग्रहदुषित (Prejudiced) पध्दतीने सदरील गाऱ्हाणे हाताळीत असल्या कारणास्तव आम्ही आमची हरकत नोंदवुन सदरील गाऱ्हाण्याचे कामकाज त्यांच्यासमोर चालवलेले नाही, तसेच हि बाब सुध्दा अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने आपल्या आदेशात जाणुनबुजुन लपवली आहे, आपल्या अधिक माहितीसाठी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षासमोर चालवलेल्या कामकाजाच्या रोजनाम्याची प्रत आम्ही या खुलास्यासोबत जोडीत आहोत.

४. महावितरणाच्य अतिरिक्त खुलास्याश्यातील आम्ही मांडलेल्या मुद्दा क्र. १ वर सादर केलेला खुलासा पुर्णत: खोटा व लबाडीचा आहे , कारण वादाकिंत मीटरची योग्य त्या प्रयोगशाळेत तपासणी झालेली नाही, त्यामुळे त्यानुसार काढलेले निष्कर्ष आम्हास मान्य नाही. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या निर्णय गुणवत्तेवर आधारित (Merit वर) दिलेला नसुन त्यात सुनावणीच्या वेळी घडलेली घटना व आमचे म्हणणे पुर्णत: लपवलेले गेले असले करणास्तव सदरील अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिलेला निर्णय हा निर्णय/आदेश होवुच शकत नाही.

५. महावितरणने सादर केलेल्या अतिरिक्त खुलास्यातील आम्ही मांडलेल्या मुद्या क्र.२ वर सादर केलेला खुलासा पुर्णत: चुकीचा व लबाडीचा, कायदयाच्या तरतुदींचा विपर्यास करणारा व मंचाची दिशाभुल करणारा आहे. कारण महावितरणाच्या म्हणण्यानुसार /कथनानुसार,

भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम क्र. ५६ (२) अन्वये ग्राहकाकडुन वसुल करण्यायोग्य असलेली रक्कम ज्या तारखेला अशी रक्कम वसुल करणेयोग्य आहे, हे निदर्शनास आले त्या तारखेपासुन मागील २४ महिन्या करिता ती रक्कम वसुल करणेच वाव आहे.

परंतु प्रत्यक्षात विद्युत कायदा , २००३ च्या कलम ५६(२) हे कलम फ़क्त वीज आकार (विज बिल) प्रदान करण्यात कसुर केल्यास वीज पुरवठा खंडीत करणेबाबत आहे व आमचे गाऱ्हाणे पुर्णत: मीटर सदोष असतांना देयक तयार करणे संबंधात आहे, व सदरील बाब पुर्णत: महाराष्ट्र विद्युत वितरण आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम, २००५ च्या विनीयम क्र.१५.४ अंतर्गत येते; आमच्या गाऱ्हाण्याचा कलम ५६ (२) च्या तरतुदीचा दुरान्वयेही संबंध नाही, तसेच महावितरणने वरील कलमाच्या तरतुदीच्या जो काही अर्थ लावला आहे तो पुर्णत: चुकीचा, कायद्याच्या तरतुदींचा विपर्यास करणारा व मंचाची दिशाभुल करणारा व आपल्या मनाप्रमाणे लावलेला आहे, प्रत्यक्षात वीज अधिनियम, २००३ च्या कलम ५६(२) तरतुद खालील प्रमाणे आहे.

*"Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, no sum due from any consumer, under this section shall be recoverable after the period of two years from the date when such sum became first due unless such sum has been shown continuously as recoverable as arrear of charges for electricity supplied and the licensee shall not cut off the supply of the electricity".*

*" त्यावेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी या कलमान्वये कोणत्याही ग्राहकाकडुन येणे असलेली रक्कम जर अशी रक्कम वीज पुरवठ्याच्या आकाराची थकबाकी म्हणुन नियमीतपणे वसुल योग्य असल्याची दाखविण्यात आली नसेल तर जेव्हा अशी रक्कम पहिल्यांदा येणे असेल त्या तारखेपासुन दोन वर्षाचा कालावधी वसुली योग्य असणार नाही आणि परवानाधारक विजेचा वीज पुरवठा खंडित करणार नाही".*

६. महावितरणाने सादर केलेल्या अतिरीक्त खुलास्यात सादर केलेल्या माहे-एप्रील १६ ते माहे जुन-१८ पावेतोचा वीज वापराचा तक्ता व त्याखालील नमुद केलेली अतिरिक्त निगडीत माहिती ही पुर्णत: धडधडीत खोटी लबाडीची , मे. मंचाची दिशाभुल करणारी आहे. कारण आमचा विजेचा वापर हा वेळोवेळी कमी जास्त आहे, कारण आमच्या प्रतिष्ठानच्या ठिकाणी लावलेल्या मशिनरी ह्या आवश्यकते नुसार गरजेनुसार चालतात त्यासाठी आपण CPL (Counsumer Personal Ledger) मधील वीज वापरासह आमच्या कमाल मागणी (Maximum Demand ) यांचेपण अवलोकन करावे; तसेच मागे माहे ऑगस्ट १७ मध्ये आम्ही आमच्या वर नमुद प्रतिष्ठानचा जोडभार (Connected Load) ७० Kw ते ५० kw व करारांतर्गत मागणी (Contract Demand) ७० केव्हीए ते ५० केव्हीए पर्यंत कमी केली होती . आपल्या अधिक माहितीसाठी त्यासंबंधात दस्ताएवज आम्ही या खुलास्यासोबत जोडीत आहेत.

७. महावितरणाने सादर केलेल्या अतिरीक्त खुलास्यातील शेवटच्या पानावरील विनंती या सदरात खालील प्रमाणे सादर केलेले महावितरणाचे कथन /म्हणेणे हे पुर्णत: कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीचा विपर्यास करणारे तसेच मंचाची पध्दतशीरपणे दिशाभुल करुन अप्रत्यक्षपणे अवमान करणारे आहे., त्याचा खुलासा तो येणे प्रमाणे



Scanned by CamScanner

**महावितरणाने सादर केलेल्या अतिरीक्त खुलास्यातील शेवटच्या पानावरील विनंती या सदरात सादर केलेले कथन/म्हणणे :**

MERC विनियम १५.४ विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) यांचे संयुक्त वाचनातुन होत असलेल्या आकलनानुसार जर-

१. मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत नसेल तर अशा परिस्थितीत MERC विनियम १५.४ नुसार वीजबिल निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणून निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील तीन महिन्याचा घेणे असे अपेक्षीत आहे.
२. मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत असेल तर अशा परिस्थितीत विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) नुसार वीज बिल निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणुन निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील २४ महिन्याचा घेणे असे अपेक्षीत आहे.

पण प्रत्यक्षात MERC विनियम १५.४ म्हणजेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ च्या विनियम क्र. १५.४. यात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

**मीटर सदोष असतांना देयके तयार करणे -**

१५.४.१ अधिनियमाच्या भाग १२ आणि भाग मधील तरतुदींना अधीन राहुन , मीटर सदोष असले तर तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यात आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यात आला असेल तर, मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्याच्या कालावधीतील ग्राहकांच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरची मोहर तुटलेली किंवा त्यास हानी पोहचली असल्यास मीटरमधील दोषांची अथवा बिघाडांची तपासणी करण्यात येईल. मीटर सदोष असल्यास , वरील खंड १५.४.१ नुसार आणि बिघडवले गेले असल्यास अधिनियमाच्या कलम १२६ किंवा १३५ नुसार प्रत्येक प्रकरणी त्यातील परिस्थितीवर अवलंबुन आकार निर्धारण करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले गेले असल्यास ज्या महिन्यात नोंदी घेणे थांबले गेले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्यापर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे त्या महिन्यामागील बारा महिन्यात मीटरवर नोंदल्या गेलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारित, ग्राहकाचे देयक तयार करण्यात येइल.

यात कोठेही महावितरणच्या कथनाप्रमाणे *" मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत नसेल तर अशा परिस्थितीत MERC विनियम १५.४नुसार वीज बिल निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणुन निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील ३ महिन्याचा घेणे असे अपेक्षित आहे".* असे कोठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नमुद केलेले नाही.

तसेच मागे नमुद केल्याप्रमाणेच विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६(२) यात खालील प्रमाणे नमुद केले आहे.

*"Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, no sum due from any consumer, under this section shall be recoverable after the period of two years from the date when such sum became first due unless such sum has been shown continuously as recoverable as arrear of charges for electricity supplied and the licensee shall not cut off the supply of the electricity".*

*" त्यावेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी या कलमान्वये कोणत्याही ग्राहकाकडुन येणे असलेली रक्कम जर अशी रक्कम वीज पुरवठ्याच्या आकाराची थकबाकी म्हणुन नियमीतपणे वसुल योग्य असल्याची दाखविण्यात आली नसेल तर जेव्हा अशी रक्कम पहिल्यांदा येणे असेल त्या तारखेपासुन दोन वर्षाचा कालावधी वसुली योग्य असणार नाही आणि परवानाधारक विजेचा वीज पुरवठा खंडित करणार नाही ".*

यात कोठेही महावितरणच्या कथनाप्रमाणे *" मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत असेल तर अशा परिस्थितीत विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) नुसार वीज बील निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणुन निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील २४ महिन्याचा घेणे असे अपेक्षित आहे". असे कोठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नमुद केलेले नाही.*

संदर्भिय गाऱ्हाणेसंदर्भात , मेहरबान विद्युत लोकपाल (Electricity Ombudsman) मेहरबान ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने (Consumer Grievence Redressal Forum) वेळोवेळी योग्य ते निर्णय /निवाडे/आदेश निर्गमीत व जाहीर केलेले आहेत, ते येणेप्रमाणे :



Scanned by CamScanner

**निर्णय /निवाडे/आदेश :-**

1. Representation No. 11 OF 2012 (Shri Abdul Hamid Salam V/s. MSEDCL)
2. Representation No. 100 OF 2010 (M/s. Rajlaxmi Home Products V/s. MSEDCL
3. Case No. 21/2016-17 (Vega Chemicals Pvt. Ltd. V/s. MSEDCL)

**विनंती :-**

तरी मे. मंचास नम्र विनंती की,

अ. महावितरणाने सादर केलेला वर नमुद केलेला अतिरिक्त खुलासा मुदतीत सादर केला नसल्याकारणास्तव तो सदरील गाऱ्हाण्यात ग्राह्य न धरता फेटाळण्यात यावा.

आ. महावितरणाने सादर केलेल्या अतिरिक्त खुलासा हा पुर्णत: चुकीचा, लबाडीचा , कायद्याच्या तरतुदींचा विपर्यास करणारा व मंचाची दिशाभुल करणारा असल्या कारणास्तव, तसेच ही बाब प्रत्यक्षपणे मंचासमोर उघड होणे न्यायाच्या द्रुष्टीने गरजेचे व आवश्यक असल्याकारणास्तव सदरील गाऱ्हाण्याची प्रत्यक्ष सुनावणी होणे गरजेचे आहे व तसे न घडल्यास ग्राहकाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तरी सदरील गाऱ्हाण्याची प्रत्यक्ष सुनावणी ठेवण्याचे करावे.

इ. मेहरबान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने जाहीर केलेल्या विनियमाअन्वये, आमच्या वर नमुद वीज जोडणीस पुर्वी महावितरण कंपनीकडुन वीज आकारणी करणेसंदर्भात लावलेले वीज मोजणी यंत्र (Meter) ज्या महिन्यापासुन सदोष (Faulty) आढळुन आले त्या महिन्यापासुन मागील जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्याच्या कालावधीतील वीज देयकांची रक्कम समायोजित करुन, संदर्भिय वीज देयके रद्दबातल टरवुन , नवीन वीज देयके देणेबाबत, योग्य ते आदेश पारित करावे.

ई . न्यायाच्या दृष्टीने , अर्जदाराच्या हिताचे व अर्जदाराच्या बाजुने योग्य ते अन्य आदेश पारित करावे.

**वितरण कंपनीची बाजु :-**

वितरण कंपनीचे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.२७११ दि.०९.०७.२०१८ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.

तक्रारकर्ता श्री चंपालाल बाबुलाल सोनी.(गोल्ड जिम) सर्वे नं-४९०,प्लॉट नं -५८, एम.जे.कॉलेज जवळ, जळगाव यांचे मागणी नुसार दि.३०.०५.२०१५ ला ग्राहक क्र.११००१४५५१३६१ नुसार विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर ग्राहकाने दि.२८.०७.२०१७ रोजी वीज बील जास्त असल्याची तक्रार केलेली असुन वीज बील दुरुस्तीची विनंती केलेली होती. त्यानुसार ग्राहकाचे मीटर तपासणी फ़ी भरुन मीटर चाचणी विभाग जळगाव येथे तपासणी करीता पाठविण्यात आले होते. त्यांचा तपासणी अहवाल दि. ३१.०८.२०१७ ला प्राप्त झाला त्यानुसार सदर ग्राहकाचे मीटर २९.६९ टक्के स्लो असल्याचे दिसुन आले तसेच सदर मीटरचा MRI Data ३१.०७.२०१७ रोजी काढण्यात आलेला असुन त्यानुसार दि.२७.०६.२०१५ च्या १७.०२५ वाजेपासुन मीटरची आर फ़ेज PT मिर्सींग च आर फ़ेज करंट १४.०० ॲम्पीअर व वाय फ़ेज करंट ०.०० ॲम्पीअर असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सदर ग्राहकाच्या मीटर मध्ये विद्युत पुरवठा दिल्याच्या तारखेपासुन (३०.०५.२०१५) २९.६९ टक्के वीज वापराची नोंद कमी होत होती. त्या फ़रकाचे वीजबील ग्राहकास देण्यात आले. सदर बीलबाबत ग्राहकाने प्रत्यक्ष भेट देवुन फ़रकाचे बील मान्य करुन ते भरण्याबाबतची सहमती दर्शविली. व दिनांक २५.०२.२०१८रोजी विनंती अर्ज देवुन फ़रकाचे बिल दरमहा रु. १ ते १.५ लाख व व येणारे चालु बिल भरण्याची विनंती केली. व त्या नुसार माहे फ़ेब्रुवारी-१८ मध्ये मंजुरीही देण्यात आली आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की मीटर चाचणी अहवाल व एम. आर. आय डाटा याचे वरुन ग्राहकाचे मीटर नक्की केव्हापासुन स्लो आहे हे दिसुन येत असल्याने ग्राहकास मीटर बसविल्यापासुन फ़रकाचे वीजबील देण्यात आलेले आहे. वरील परिस्थिती मा.अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष जळगाव यांनी ग्राह्य धरुन ग्राहकाचा अर्ज निकाली काढलेला आहे.

**तसेच दि. २७.०७.२०१८ रोजी झालेल्य सुनावणी दरम्यान कार्यकारी अभियंता, जळगाव विभाग यांनी सदर प्रकरणाबाबत सविस्तर खुलासा सादर करण्यासंदर्भात एका आठवड्याची मुदत वाढवुन मिळणेबाबत विनंती मंचाच्या अध्यक्षाकडे केली होती त्यास अध्यक्षांनी परवानगी दिली होती त्यानुसार त्यांनी त्यांचा अतिरीक्त खुलासा पत्र क्र. ३०२२ दि.०४.०८.२०१८ अन्वये खालील प्रमाणे सादर केला.**

तक्रारकर्ता श्री चंपालाल बाबुलाल सोनी.(गोल्ड जिम) सर्वे नं-४९०,प्लॉट नं -५८, एम.जे.कॉलेज जवळ, जळगाव यांचे मागणी नुसार दि.३०.०५.२०१५ ला ग्राहक क्र.११००१४५५१३६१ (मंजुर भार ५०के.डब्ल्यु) नुसार विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर ग्राहकाने दि.२८.०७.२०१७ रोजी वीज बील जास्त असल्याची तक्रार केलेली असुन वीज बील दुरुस्तीची विनंती केलेली होती व तपासणी अंती येणारे वीजबील भरण्याची तयारी दर्शविली होती. त्याकरीता दस्तएवज क्र.०१ सोबत जोडला आहे.



Scanned by CamScanner

त्यानुसार ग्राहकाचे मीटर तपासणी फ़ी भरुन मीटर चाचणी विभाग जळगाव येथे तपासणी करीता पाठविण्यात आले होते.सदर मीटरची तपासणी दि.३१.०८.२०१७ रोजी जळगाव चाचणी विभागात ग्राहकासमक्ष संबंधीत शाखा अधिकारी उपविभागीय अभियंता यांचे समक्ष करण्यात आली होती. त्यानुसार सदर ग्राहकाचे मीटर २९.६९ ट्कके स्लो असल्याचे दिसुन आले व मीटरचा आर फ़ेज व्होल्टेजची नोंद होत नसल्याचे दिसुन आले. द्स्तावेज क्र.०२

त्यामुळे सदर मीटरच्या सखोल तपासणीकरीता मीटरचा MRI Data काढण्यात आलेला असुन Temper Data Report नुसार माहे जुन २०१५ पासुन मीटरचा आर फ़ेज व्होल्टेजची नोंद ०.०० अशी असल्याची दिसुन येत आहे. दस्तावेज क्र.०३

त्यामुळे सदर ग्राहकाच्या मीटर मध्ये विद्युत पुरवठा दिल्याच्या तारखेपासुन (३०.०५.२०१५) २९.६९ टक्के वीज वापराची नोंद कमी होत होती. त्यामुळे महावितरणच्या महसुलाचे नुकसान झालेले होते. त्यामुळे सदर फ़रकाचे वीजबील ग्राहकास नोव्हेंबर २०१७ व जानेवारी २०१८च्या वीज देयकात अनुक्रमे रु.७९६४२१/- व रु.३६८७९२/-असे एकुण रु.११६५२१३/- देण्यात आले सदर बिलाबाबत ग्राहकाने प्रत्यक्ष भेट देवुन फ़रकाचे बिल मान्य करुन ते भरण्याबाबत सहमती दर्शविली व दि.१५०२.२०१८ रोजी विनंती अर्ज देवुन फ़रकाचे बील दरमहा रु.१ ते १.५ लाख व येणारे चालु बील भरण्याची विनंती केली. दस्तवेज क्र.४ व त्यानुसार माहे फ़ेब्रुवारी २०१८ मध्ये मंजुरीही देण्यात आली. व ग्राहकाने हफ़्ता करुन दिलेले बिल भरलेले आहे.

तसेच मा. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, जळगाव यांचे निर्णय पत्र क्र.२८७५ दि.२५.०५.२०१८ नुसार महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले बील योग्य असल्याचा आदेश पारित केलेला आहे. दस्तवेज क्र.५

श्री चंपालाल बाबुलाल सोनी.(गोल्ड जिम) यांनी पत्र दि.१३.०६.२०१८ नुसार मीटर त्यांचे समक्ष तपासणी केल्याचे व २९.६९ टक्के हळु फ़िरत असल्याचे मान्य केले आहे. तसेच मा. अंतर्गत ग्राहक गाऱ्हाणे निवारण कक्ष, जळगाव यांचे निर्णय मान्य करुन त्यांना दिलेले फ़रकाचे अतिरीक्त बील हे देखील मान्य असुन हळुहळु भरण्याचे कबुल केले आहे. दस्तावेज क्र.०६.

त्याच प्रमाणे ग्राहकाने दि.२७.०६.२०१८ रोजी उपविभागीय कार्यालयास दिलेले पत्रानुसार जबरदस्तीने तसेच बळजबरीने व दबाव निर्माण करुन लिहुन घेतल्याचे कळविले आहे. सदर बाब धादांत खोटी असुन दिशाभुल करुन वेळ मारुन नेण्याची आहे.

**मा. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच जळगाव यांचेकडे ग्राहकाच्या वतीने केलेल्या तक्रारीतील मुद्दे व त्यांच्या खंड्णाचे विश्लेषण ,**

**मुद्दा क्र. १ :** माहे नोव्हेंबर -२०१७ मध्ये रु ७९६४२१/- व जानेवारी २०१८ च्या देयकात रु.३६८७९२/-असे एकुण रु.११६५२१३/- चे देयकात अतिरीक्त वीजबील आकारणी करण्यात आली.

**खुलासा :-** ग्राहकाच्या विनंतीनुसार मीटर तपासणी चाचणीत दि.३१.०८.२०१७ अन्वये प्राप्त चाचणी अहवाला नुसार सदर मीटर २९.६९ टक्के धिम्या गतीने वीज वापराची नोंद करीअत असल्याचे निष्कर्षीत झाले. तसेच सादर मीटर मध्ये R फ़ेज व्होल्टेज मिर्सीग असल्याची अहवालात नोंद आहे सदर R फ़ेज व्होल्टेज मिर्सीग असल्याचा कालावधी ठरविण्यासाठी काढलेल्या मीटरच्या MRI डेटा नुसार सदर R फ़ेज व्होल्टेज जुन २०१५ पासुन निश्चित झाले.

उपलब्ध पुराव्यात्मक प्राप्त माहितीनुसार ग्राहकास जुन १५ ते सप्टेंबर २०१७ या कालावधी करीता वीज वापराच्या पुर्निर्धारण करण्यात आले . पुर्निर्धारीत सादर रक्कम रु.११६५२१३/- अशी आहे. व ती योग्य असल्याचे ग्राहकाने त्यांचे दि. १५.०२.२०१८ व दि.१३.०६.२०१८ च्या पत्रानुसार सदर रक्कमेचे हफ्ते करुन मिळाल्यास भरणेची विनंती केली व त्यापोटी भरणा केलेला आहे.

सदर प्रकरणात मा. अंतर्गत ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच जळगाव यांचे पत्र क्र. २८७५ दि.२५.०५.२०१८ रोजी निर्वाळा होवुन महावितरणच्या वतीने करणेत आलेली अतिरीक्त वीज बिल आकारणी योग्य असल्याचा आदेश पारीत झालेला आहे.

**मुद्दा क्र. ०२:** सदर बाब ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच जळगाव अंतर्गत केस क्र.०७/२०१८-१९ अन्वये दाखल असुन त्यानुसार ग्राहकाने MERC विनियम १५.४ नुसार मीटर सदोष ग्रुहीत धरुन आकारणी करण्याची केलेली मागणी.

**खुलासा :-** भारतीय विद्युत कायदा २००३ कलम क्र.५६ (२) अन्वये ग्राहकाकडुन वसुल करण्यायोग्य असलेली रक्कम ज्या तारखेला अशी रक्कम वसुल करनेयोग्य आहे निदर्शनास आले, त्या तारखेपासुन मागील २४ महिन्यांकरीता ती वसुल करण्याचा वाव आहे. सदर कलमानुसार सदर बाबतीत एकुण २४ महिन्यांच्या कालावधीसाठीची रक्कम वसुलीयोग्य आहे.



Scanned by CamScanner

**तसेच ग्राहकाचा वीज वापराचा एप्रील २०१६ पासुन महिनावार खालीलप्रमणे आहे.**

| महिना | एप्रील-१६ | मे-१६ | जुन-१६ | जुलै-१६ | ऑगस्ट-१६ | सप्टेंबर-१६ | ऑक्टो-१६ | नोव्हे-१६ | डिसें-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वापर (युनिट) | ५८३१ | ८२७६ | ८७३३ | ५१०५ | ८४२२ | ६७५९ | ४९४७ | ४१५० | ५५८२ |
| महिना | जाने-१७ | फ़ेब्रु-१७ | मार्च-१७ | एप्रील-१७ | मे-१७ | जुन-१७ | जुलै-१७ | ऑगस्ट-१७ | सप्टेंबर-१७ |
| वापर (युनिट) | ६८९० | ४२५४ | ६४१६ | ७२४३ | ११०५७ | ४१९३ | ९८८३ | ६१६५ | ४९६५ |
| महिना | ऑक्टो-१७ | नोव्हे-१७ | डिसें-१७ | जाने-१८ | फ़ेब्रु-१८ | मार्च-१८ | एप्रील-१८ | मे-१८ | जुन-१८ |
| वापर (युनिट) | ९८९३ | ५४२१ | ६४५२ | ६२९० | ६७७८ | ८८२५ | ११३८० | १४४०७ | १०६०२ |

**अतिरीक्त निगडीत माहिती :-**

**ग्राहकाचे मीटर दि.२०.०९.२०१७ रोजी बदली करण्यात आलेले असुन सदर नवीन बसविण्यात आलेल्या मिटर वरील नोंद झालेल्या वापरानुसार माहे ऑक्टोबर २०१७ ते जुन २०१८ पर्यंत एकुण ९ महिन्यांचा सरासरी वापर प्रतिमाह ८८९४ युनिट असा आहे. त्याच प्रमाणे माहे ऑक्टोबर २०१६ ते जुन २०१७ पर्यंत एकुण ९ महिन्यांचा सरासरी वापर प्रतिमाह ६०८१ युनिट असा आहे. ज्युन्या मिटरचा सरासरी वापर नवीन मीटरच्या सरासरी वापरापेक्षा ३१.६ टक्के इतका कमी असल्याचे दिसुन येते. वीजपुरवठा केल्याच्या दिनांकापासुन ग्राहकाचा वीजभार बदललेला नाही. सदर बाब ग्राहकास पुर्वीच्या मिटरच्या धीम्या गती अनुषंगाने काढण्यात आलेली आकारणी योग्य असल्याची पुष्टी देते.**

**विनंती :-** MERC विनियम १५.४ विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) यांचे संयुक्त वाचनातुन होत असलेल्या आकलनानुसार जर-

१. मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत नसेल तर अशा परिस्थितीत MERC विनियम १५.४ नुसार वीजबिल निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणून निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील तीन महिन्याचा घेणे असे अपेक्षीत आहे.

२. मीटरचा नादुरुस्त होण्याचा कालावधी निश्चित होत असेल तर अशा परिस्थितीत विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) नुसार वीज बिल निर्धारण कालावधी मीटर नादुरुस्त म्हणुन निश्चित झालेल्या तारखेपासुन मागील २४ महिन्याचा घेणे असे अपेक्षीत आहे.

सदर प्रकरणात मीटरचा आर फ़ेज व्होल्टेजची नोंद नसल्याचा कालावधी पुराव्यासह निश्चित होत असल्याने तसेच ग्राहकास कमी केलेल्या बिलाच्या फ़रका व्यतिरीक्त दंड, व्याज, अतिरीक्त आकार लावण्यात आलेला नसुन फ़क्त नियमीत दराने वीज वापर निर्धारणप्रमाणे लावण्यात आलेली आहे. ग्राहकास दिलेले बिल योग्य असुन कंपनीच्या महसुल बुडीत फ़रकाचे दिलेले आहे. ग्राहकाने हे बिल न भरल्यास याचा बोजा इतर ग्राहकांवर येवु शकतो. तरी महावितरणचा न्याय्य महसुल उपरोक्त अनुक्रमांक २ अन्वये नमुद केल्यानुसार मा.मंचाने कृपया ही बाब विचारात घेवुन निर्वाळा द्यावा.

**अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाही :-**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, जळगाव अंतर्गत दि. १८.०५.२०१८ रोजी सुनावणी होवुन पत्र क्र.२८७५ दि.२५.०५.२०१८ अन्वये पुढील प्रमणे निर्णय देण्यात आला :-

*१. महावितरणकडुन ग्राहकास देण्यात आलेले बिल योग्य आहे.*
*२. सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.*



Scanned by CamScanner

**मंचाचे निष्कर्ष :-**

तक्रारदाची तक्रार, दाखल कागदपत्रे विजवितरण कंपनीचे म्हणने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

१. ग्राहक प्रतिनीधी यांनी श्री चंपालाल बाबुलाल सोनी यांचे मिटरची आर फ़ेज पि.टी. मिसींग असल्याने २९.६९ ट्क्के स्लो फ़िरत असल्यामुळे महावितरणने माहे जुन-२०१५ पासुन सप्टेंबर -२०१७ पर्यंत ३१ महिन्याचे दिलेले बील रद्द करुन MERC विनीयम १५.४.१ नुसार दुरुस्त करुन फ़क्त ३ महिन्याचे देण्यात यावे व त्यासाठी खालील निर्देश /निवाडे /निकाल सादर केले आहे. १. Representation No. 11 OF 2012 (Shri Abdul Hamid Salam V/s. MSEDCL)
२. Representation No. 100 OF 2010 (M/s. Rajlaxmi Home Products V/s. MSEDCL
परंतु वरील Hon.Electricity Ombudsman यांनी यासारख्याच (Similer Case) प्रकरणामध्ये २९/२०१४ ऑर्डर दि.२५.०८.२०१८ नुसार ४८६ दिवसांची Assesment लावण्याचे आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशाचा दिनांक हा वरील प्रमाणे ग्राहक प्रतिनीधी यांनी नमुद केलेल्या संदर्भ १ व २ च्या आदेशा नंतरचा असल्याने सदर आदेश ग्राह्य धरता येणार नाहीत.

२. तसेच CGRF कल्याण यांनी सुध्दा Similer Case मध्ये Grievance No. K/E/१३०८/१५४९ of २०१७-१८ दि.२७.०६.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशनुसार ग्राहकास मे-२०१५ ते डिसेंबर-२०१७ पर्यंतची ३२ महिन्यांची Assesment योग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन, विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करुन मंच या प्रकरणी खालील निर्णय देत आहे.

**निर्णय**

१. सदर गाऱ्हाणे फ़ेटाळण्यात येत आहे.

२. अशा प्रकारे ग्राहकास बसविण्यात आलेले मिटर अचानक २९.६९ ट्क्के स्लो कसे झाले त्याच्या तपासणीची जबाबदारी कोणावर होती त्याबाबत महावितरणचे जबाबदार अधिकारी कोण ? याबाबत महावितरणने सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी.

३. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाची पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यावरील कार्यवाहीचा अहवाल मंचाकडे एक महिन्यात सादर करावा.

४. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.२२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागु शकतात.

५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र.१७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे, (द्वारा-महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ केशवा बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई-४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासुन ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| **(चंद्रकांत मोहन येशीराव)** | **(विजयानंद संपतराव काळे)** | **(भास्कर गोविंदा पालवे.)** |
| **सदस्य** | **सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता.** | **अध्यक्ष** |

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. मुख्य अभियंता,मरा.वि.वि.कं.(मर्या), विद्युत भवन, परिमंड्ळ कार्यालय, जळगाव.
२. अधिक्षक अभियंता, मरा.वि.वि.कं.(मर्या)मंडळ कार्यालय,जळगाव.

**सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता**
**म. रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच,**
**जळगाव.परिमंडळ, जळगाव**



Scanned by CamScanner